प्रकरण पाचवे

# समारोप

## प्रकरण पाचवे

# समारोप

ब्रिटीश राजवटीतून हिंदुस्थान मुक्त करुन नवभारत निर्मितीचा ध्यास अनेक देशभक्तांनी घेतला होता. त्या प्रेरणेने त्यांनी केलेल्या अथक परिश्रमातून आणि त्यागातून उभारलेल्या प्रदीर्घ लढ्यातून भारत स्वतंत्र झाला, त्यासाठी राष्ट्रवादाने प्रेरित झालेल्या अनेक नेत्यांनी आणि तरुणांनी आपल्या प्राणाची जराही तमा बाळगली नाही देदिप्यमान स्वातंत्र्य लढ्यातून उदयाला आलेला भारत समाजाच्या सर्व क्षेत्रात प्रगती करेल, अशी अशा प्रत्येकाने बाळगली होती. परंतु स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षाच्या काळात ती ध्येये अपेक्षित होती. ती साध्य होवू शकली नाहीत. कारण ज्या व्यापक वैचारिक पायावर हिंदुस्थान स्वतंत्र झाला त्या वैचारिक वारसाचा विसर भारतीय समाजाला होवू लागला आहे. त्यामुळे त्या वैचारिक तत्वज्ञानाचे स्मरण समाजाला करुन देणे आवश्यक बनले आहे. आधुनिक औद्यागिक समाज स्वत:ला आधुनिक म्हणून संबोधत असला तरी त्यातील पोलपणा जाणवू लागला आहे. आधुनिकतेचा वेध घेत असताना इतिहासाकडे आणि इतिहासाने दिलेल्या वैचारिक ठेव्याचे भान समाजातील सर्व घटकांनी ठेवणे आवश्यक असते. परंतु वास्तवात तसे होताना दिसत नाही. म्हणून स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून विविध नेतृत्वांनी, विचारवंतानी आपल्या मौलिक विचारांचा ठेवा समाजाला दिला आहे. समाजाची ती गरज भागविण्यासाठी विचार संशोधन करणे आवश्यक वाटते. त्याचाच एक भाग म्हणून प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय 'सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय विचार' हा निवडला आहे. त्याद्वारे आजच्या समाजासाठी प्रस्तुत ठरणारे संदर्भ शोधले आहेत ज्यामुळे समाजापुढे सुभाषचंद्राच्या विचारांचा आदर्श ठेवता येईल.

सुभाषचंद्र बोस हे थोर देशभक्त होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान दिले आहे. शिवाय भारतीय समाजापुढे आदर्श वैचारिक तत्वज्ञानही ठेवले आहे. त्यांनी आपल्या विशिष्ट राजकीय सिद्धांत्ताची मांडणी केली आहे. तसेच आपल्या नेतृत्वाचा ठसाही उमटविला आहे. म्हणून त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचे व कृतिशील विचारांचे संशोधन करण्याची गरज ओळखून प्रस्तुत शोधप्रबंध शीर्षकाची निवड केली आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधाची मांडणी पाच प्रकारणामध्ये केली आहे. त्यासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व ग्रंथालयीन पध्दतीचा अवलंब करुन शोधप्रबंध तयार करण्यात आला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाचा अभ्यास 'सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय विचार' हा आहे. त्या अनुषंगाने त्यात सुभाषबाबूंच्या विचारधनाची सविस्तर मांडणी केली आहे. याशिवाय त्यांच्या बालपणापासून ते मृत्यूपर्यंतच्या जीवन प्रवासाचा आढावा घेतला आहे. आपल्या अल्पावधीच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी ब्रिटीश सत्तेविरुध्द निकरांची झुंज तर दिलीच, शिवाय भारतीय समाजाला आदर्श वैचारिक वारसाही दिला. त्या वैचारिक वारशाचे चिंतन करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

नेताजींनी उज्ज्वल नवभारताच्या निर्माणासाठी केलेले कृतिशील व वैचारिक कार्य आजही मार्गदर्शक स्वरुपाचे आहे. आपल्या शैक्षणिक जीवनापासून ब्रिटीश गुलागिरीविरुध्द लढण्याची जिद्द सुभाषबाबुंच्या ठायी होती, ती जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत कायम राहिली. बालपणाचा आध्यात्मिक व परोपकारी कौटुंबिक वारसा नेताजींना प्रेरक ठरला. तसेच शिक्षण घेत असताना उदात्त राष्ट्रभावनेच्या ध्येयाने प्रेरित झालेले गुरुजन त्यांना भेटले. ही पार्श्वभुमि सुभाषबाबुंना व्यापक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करुन देणारी ठरली.

इंग्रजांच्या साम्राज्यवादी युगात आय.सी.एस.पदवी हे सुशिक्षित तरुणांचे खास आकर्षण होते. मात्र सुभाषबाबुंना त्याचे कधीच आकर्षण वाटले नाही. परंतु वडीलांच्या सांगण्यावरुन त्यांनी आय.सी.एस.ची परीक्षा दिली. त्यात त्यांना घवघवीत यशही मिळाले. या यशाने भारावून जावून ब्रिटीशांची नोकरी करने नेताजींना रुचले नाही. म्हणून त्यांनी आय.सी.एस.चा राजीनामा देवून स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. तो त्यांचा निर्णय केवळ त्यांच्या व्यक्तीगत जीवनालाच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्यचळवळीला नवी दिशा देणारा क्षण ठरला.

१९२१मध्ये नेताजींनी पहिल्यांदाच असहकार अंदोलनाच्या रुपाने स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. तेव्हापासून त्यांनी स्वातंत्र्य आंदोलन चळवळीतून कधीही माघार घेतली नाही. १६ जुलै १९२१ रोजी म.गांधींच्या भेटीने सुरु झालेला त्यांचा राजकीय जीवनप्रवास १९ ऑगस्ट १९४५ पर्यंतच्या अखेरच्या घटकेपर्यंत सुरु राहिला. या २४ वर्षाच्या कालखंडात त्यांनी ११ वेळा सहा वर्षे तुरुंगवास भोगला. तसेच त्यांचा मार्च १९३३ ते एप्रिल १९३६ हा तीन वर्षाचा काळ विजनवासात गेला. या काळात प्रकृती अस्वास्थ्यामुळे गप्प न बसता, त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनाचे कार्य सुप्तपणे सुरुच ठेवले होते. वडील जानकीनाथांच्या मृत्यूसमयी ही नेताजींना उपस्थित राहता आले नाही. या काळात त्यांनी विठ्ठलभाई पटेल, मुसोलिनी, फ्रेंच साहित्यिक रोमाँ रोलाँ, डॉ. हाऊशॉपर या प्रमुख नेत्यांच्या भेटी घेवून स्वातंत्र्य चळवळीला उपयुक्त ठरणारे आंतरराष्ट्रीय संदर्भ जाणून घेतले. या सर्वांमधून वाट्याला आलेल्या १२ वर्षाच्या राजकीय जीवनात त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा भारतीय समाजजीवनावर उमठविला.

आपल्या युरोपातील वास्तव्यात नेताजींच्या एमिली स्केन्की बरोबरच्या ओळखीची परिणीती विवाहबध्द होण्यात झाली. तरीही त्यांना प्रपंचाचा मोह जडला नाही. व्यापक

ध्येयाने प्रेरित झालेल्या सुभाषबाबुंना राष्ट्रापेक्षा, कुटुंब, परिवार, नातीगोती महत्त्वाची मानली नाहीत. राष्ट्रभक्तीतील हा त्यांचा ठेवा मौल्यवान आहे.

१९३३ ते १९३८ या काळात सुभाषबाबू अलिप्त राहिले, असले तरी स्वातंत्र्य चळवळीबाबत ते जागृत होते. याची साक्ष त्यांच्या फेब्रुवारी १९३८ मधील हरिपूर काँग्रेसच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवडीतून मिळते. मात्र पुढील वर्षीच्या त्रिपूरा काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीमुळे सुभाषबाबू व म. गांधीजी यांच्यात वैचारिक दरी निर्माण झाली. हे वैचारिक मतभेद पुढे कायम राहिले. त्याचा परिपाक म्हणून सुभाषबाबुंनी 'फॉर्वर्ड ब्लॉक' या डाव्या विचाराच्या गटांची स्थापना केली. हे करताना त्यांनी फॉर्वर्ड ब्लॉक ही काँग्रेसला पर्याय नसुन काँग्रेस अंतर्गत कार्य करणारी संघटना राहिल हे निक्षुण सांगितले होते. तरी देखील शिक्षणांच्या कारणावरुन सुभाषबाबूंना तीन वर्षासाठी काँग्रेसमधून निलंबीत करण्यात आले. दरम्यान हॉलवेल प्रकरणावरुन नेताजींना जुलै १९४० मध्ये अटक करण्यात आली. संपूर्ण हिंदुस्थानात स्वातंत्र्य संग्राम सुरु असताना सुभाषबाबुंना तुरुंगातील वास्तव्य अस्वस्थ करीत होते. म्हणून त्यांनी अमरण उपोषणाचा मार्ग अवलंबिला. त्यामुळे बोस यांना तुरुंगातून मुक्त करून त्यांच्या राहत्या घरी नजरकैदेत ठेवले.

दरम्यानच्या काळात सुरू झालेले दुसरे जागतिक महायुध्द, बदललेले आंतरराष्ट्रीय संदर्भ यामुळे सुभाषबाबूंनी इटली व जर्मनीची मदत घेऊन स्वातंत्र्य चळवळीला लढाऊरूप देण्याची गुप्त कल्पना तयार केली. त्यासाठी स्वतःची नजरकैदेतून सुटका करून घेऊन देश सोडला. त्यानंतर जर्मनी व इटलीची मदत घेऊन सुभाषबाबू जपानमध्ये दाखल झाले. तेथील रासबिहारी बोस यांनी स्थापन केलेल्या आझाद हिंद फौजेचे नेतृत्व स्वीकारून स्वातंत्र्यलढा तीव्र बनविला. मात्र, दुसऱ्या महायुद्धात जपानच्या झालेल्या पराभवामुळे सुभाषबाबूंना माघार घ्यावी लागली. दरम्यानच्याकाळात स्थापन केलेले हंगामी सरकार बरखास्त करणे त्यांना भाग पडले. या अपयशामुळे खचून न जाता. रशियाची मदत घेण्याचा

प्रयत्न नेताजींनी केला. मात्र, नवीन मोहीम उघडण्या अगोदरच त्यांचा अनाकलनीय अपघाती मृत्यू झाला.

नेताजींच्या या प्रदीर्घ वाटचालीतून त्यांच्या जाज्ज्वल्य देशभक्तीचा प्रत्यय येतो. अशाप्रकारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारखे सर्वत्यागी व्यक्तिमत्त्व हरपले असले तरी त्यांचा वैचारिक ठेवा कायम राहिला आहे.

**जीवन परिचय व राजकीय प्रभाव**

आपल्या अल्पावधीच्या राजकीय कारकिर्दीत सुभाषबाबूंनी मिळविलेल्या यशाचे गमक समजून घेण्यासाठी त्यांचा जीवन परिचय करून घेणे क्रमप्राप्त ठरते. सुभाषबाबूंचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्यापाठीमागे त्यांच्या कौटुंबिक वातावरणाचा मोठा हातभार आहे. त्यांचा जीवन परिचय करून घेताना नेताजींवर त्यांची आई प्रभावती देवी यांचा विशेष प्रभाव असल्याचे जाणवते. सुभाषबाबूंनी जीवनात नैतिकतेला प्रमाण मानून वाटचाल केली. कौटुंबिक वातावरणाने नेताजींचे नैतिक अधिष्ठान पक्के झाले. धार्मिक सहिष्णुवृत्ती हा सुभाषबाबूंच्या कुटुंबातील आदर्श गुण होता. त्यामुळे सुभाषबाबू धर्मनिरपेक्ष बनले. ब्रिटिशांच्या दडपशाहीचा निषेध म्हणून सुभाषबाबूंचे वडील जानकीनाथ बोस यांनी रायबहादूर या पदवीचा त्याग केला. वडिलांची ही स्वाभीमानी देशभक्ती सुभाषबाबूंमध्ये संक्रमित झालेली होती. याचा प्रत्यय सुभाषबाबूंच्या आय.सी.एस.चा राजीनामा देण्याच्या कृतीतून दिसून येतो. सुभाषबाबू व्यक्तिगत जीवनात आध्यात्मिक वृत्तीचे बनू शकले. याचे कारण त्यांच्या कुटुंबातील आध्यात्मिक वातावरण हे होते. सुभाषबाबूंच्या आई-वडिलांबरोबरच ज्येष्ठ बंधू शरदचंद्र बोस यांचीही भूमिका सुभाषबाबूंना प्रेरक ठरली.

सुभाषबाबूंच्या संस्कारक्षम वयात राष्ट्रवादाचे धडे देणारे शिक्षण त्यांना मिळाले. प्रोटेस्टेट युरोपियन बाप्टिष्ट मिशन स्कूलने पोसलेला वर्णद्वेष नेताजींना शासकांच्या विरुद्ध विद्रोही करावयास लावणारा ठरला. तसेच रेव्हनशॉ कॉलिजिएट स्कूलमध्ये माध्यमिक

शिक्षण घेत असताना बेनीमाधव दास यांच्यासारखे आदर्श गुरू सुभाषबाबूंना लाभल्यामुळे सुभाषबाबूंच्यात नितीमूल्य व सौंदर्यमूल्यांचे बिजारोपण झाले. तसेच जीवनाच्या ऐन तारुण्यात स्वामी विवेकानंदांची पुस्तके सुभाषबाबूंनी वाचली त्यामुळे सुभाषबाबूंचा आध्यात्मकतेकडचा कल वाढला. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, योगी अरविंदो यासारख्या महान देशभक्तांच्या विचारांची ओळख सुभाषबाबूंना ऐन तारुण्यात झाल्यामुळे त्यांच्या कल्पनेतील नव राष्ट्रनिर्मितीचा ध्यास सुभाषबाबूंनी घेतला. सुभाषबाबूंच्या विचारांवर श्री रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचा विशेष प्रभाव जाणवला. सुभाषबाबूंनी विद्यार्थीदशेपासून गोरगरिबांना सहाय्य करण्याची जी भूमिका घेतली त्याचे प्रेरणास्थान श्री रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद हे होते.

सुभाषबाबूंचा जीवन परिचय व त्यांच्यावरील राजकीय प्रभावाचा अभ्यास करताना सुभाषबाबूंवर त्यांचे राजकीय गुरू देशबंधू चित्तरंजन दास यांचा विशेष प्रभाव जाणवतो. देशबंधूंचे प्रभावी व्यक्तिमत्त्व व त्यांचे कार्य पाहून सुभाषबाबू प्रभावित झाले होते. देशबंधूंशी झालेल्या पहिल्या भेटीत सुभाषबाबूंना देशबंधूंच्या रूपाने राजकीय गुरू गवसला. नेताजींनी, देशबंधूंना ''बंगालच्या राष्ट्रसेवा महोत्सवातील सर्वश्रेष्ठ आचार्य'' असा गौरव करून त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रकार्यात स्वतःला झोकून दिले.

सुभाषबाबूंवर लेनिनचाही प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. लेनिने ज्याप्रमाणे पोथिनिष्ठ मार्क्सवादाऐवजी व्यवहारिक भूमिका घेऊन रशियाच्या संदर्भात साम्यवादात सुधारणा केली. त्याप्रमाणे भारतातही मार्क्सवादाचे अंधानुकरण होऊ नये. असे सुभाषबाबूंना वाटत होते. सुभाषबाबूंनीही लेनिनप्रमाणे नियोजनातून विकास हे उद्दिष्ट समोर ठेवले होते. त्यांच्या हरिपूर कॉंग्रेसच्या अध्यक्षीय भाषणावरून त्यांच्यावरील लेनिनचा प्रभाव स्पष्ट होतो. तसेच आझाद हिंद फोजेचे नेतृत्व करताना नेताजींनी लेनिनप्रमाणे प्रशासकीय कौशल्यांचा अवलंब

केलेला दिसतो. सारांश रूपाने मार्क्स व लेनिनच्या प्रभावामुळे समाजवाद हा नेताजींच्या समग्र विचारातील आधार बनला.

सुभाषबाबूंनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर थोड्या काळासाठी 'केंद्रीभूत शासनाची' कल्पना मांडली आहे. त्यांच्या या संकल्पनेवर तुर्कस्थानचा नेता गाझी मुस्ताफा केमाल पाशाची छाप पडली होती. अंदमान व निकोबार बेटावर स्थापन केलेल्या अस्थायी शासनावर केमाल पाशाच्या लष्करी व्यवस्थेचा प्रभाव होता हे मान्य करावे लागते.

राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिशांच्या शत्रूराष्ट्रांच्या मदतीने स्वातंत्र्य आंदोलन तीव्र करावे, असे नेताजींना वाटत होते. द्वितीय महायुद्ध सुरू झाल्यानंतर सुभाषबाबूंनी त्या दृष्टीने ज्या हालचाली सुरू केल्या त्याचे प्रेरणास्थान आर्यलंडच्या सिन-फेन चळवळीचा नेता डी. व्हेलेरा हे होते.

सुभाषबाबूंच्या जीवनकार्यावर महात्मा गांधींचा प्रभाव जाणवतो. महात्माजींच्या प्रबळ राष्ट्रवादाचा आणि त्यांनी राष्ट्रीय सभेला प्राप्त करून दिलेला पाया यामुळे सुभाषबाबू अधिक प्रभावित झाले होते. सुभाषबाबूंना गांधीजी स्वराज्यप्राप्तीचा अहिंसक मार्ग मान्य नव्हता हे प्रकर्षाने जाणवते. काँग्रेसही सनदशीर मार्गाने जाणारी चळवळ असावी असे गांधीजींना वाटत होते तर सुभाषबाबू काँग्रेसला डाव्या विचाराचे व लढाऊ बनवू पहात होते. या वैचारिक पार्श्वभूमीवर गांधीजी आणि बोस यांच्यात मतभेद निर्माण झाले होते.

गांधीजींनी असहकार चळवळीतून माघार, गांधी आयर्विन करार, गोलमेज परिषद या प्रमुख मुद्यांवर त्यांच्यात वैचारिक मतभेद वाढत गेले होते. मात्र, त्या मतभेदांमुळे सुभाषबाबूंनी गांधीजींबद्दल नेहमी आदर राखला होता. आझाद हिंद फौजेमध्ये महात्माजींचा केलेला जयजयकार गांधीजींबद्दल आदर व्यक्त करणारा होता.

एकंदरीत सुभाषबाबूंच्या जीवनात जी अध्यात्मिक परोपकारी व धर्मनिरपेक्ष वृत्ती आली ती कौटुंबिक प्रभावातून आल्याचे स्पष्ट जाणवते. तसेच ब्रिटिशांच्या अन्यायी व

दडपशाही धोरणांमुळे सुभाषबाबूंना गुलामगिरीची जाणीव झाली. परमहंस, स्वामी विवेकानंद व वेणीमाधव दास यांच्यासारख्या गुरूंच्या प्रभावातून सुभाषबाबूंचे आचरण शुद्ध व नैतिक बनल्याचे दिसते. योगी अरविंदो व बॅ. सी. आर. दास यांच्या विशेष प्रभावातूनच सुभाषबाबूंची प्रखर राष्ट्रवादी व स्वराज्यवादी भूमिका साकारली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुभाषबाबूंनी भारतात केंद्रोन्मुख मध्यवर्ती शासनाची कल्पना मांडली होती. त्यावर लेनिन, केमाल पाशा, मुसोलिनी व हिटलर यांचा एकत्रित प्रभाव पडला होता.

शोधप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात सुभाषबाबूंच्या राजकीय सहभागाचा व योगदानाचा अभ्यास केला आहे. सुभाषबाबू १९२१ मध्ये राजकारणात सक्रिय सहभागी झाले असले तरी त्यांचे विद्यार्थीदशेतील जीवन हेच खऱ्या अर्थाने राजकीय जीवनाचा आरंभ बिंदू ठरला होता. सुभाषबाबू प्रोटेस्टंट युरोपीनय स्कूलमध्ये प्राथमिक शिक्षण घेत असताना व रेव्हन शॉ कॉलेजिएट स्कूलमध्ये माध्य. शिक्षण घेत असताना ब्रिटिश राजवटीचे जे अनुभव आले त्यातून त्यांचे राष्ट्रवादी विचारांचे अधिष्ठान पक्के झाले. यावेळी 'नवविवेकानंद'वादी गटाशी आलेला संपर्क आणि क्रांतिकारी विचारांच्या तरुणांशी झालेली जवळीक सुभाषवाबूंना वैचारिक बळ देणारी ठरली. याच काळात बेणीमाधव दास यांच्यासारखे नीतीमूल्याचे बीजारोपण करणारे गुरूवर्य सुभाषबाबूंना भेटले. हा आदर्श त्यांच्या भावी राजकीय वाटचालीस दिशा देणारा ठरला. त्यामुळे त्यांनी आजीवन शुद्ध नैतिक तत्त्वांचे आचरण केलेले दिसते. विद्यार्थी जीवनात स्वामी विवेकानंदांचे 'भरतमन भारत' व अन्य समग्र तत्त्वज्ञान वाचण्याची संधी मिळाली, त्यामुळे त्यांना 'सर्व सुखाचा त्याग करून पवित्र जीवन जगण्याचा' संदेश मिळाला म्हणून ते भावी जीवनात त्यागी व निःस्वार्थी भूमिका बजावतात. शिक्षण घेत असताना आलेले विदारक अनुभव व प्रा. ओटेन प्रकरणामुळे सुभाषबाबूंचे विद्यार्थी जीवन हे एक राजकीय जीवनाची सुरुवातच ठरली होती.

शिक्षणाच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी मोठ्या जिद्दीने आय.सी.एस.ची परीक्षा उत्तीर्ण होऊन दाखविली आणि वडील जानकीनाथांच्या विश्वासाला पात्र ठरले. आय.सी.एस.साठी घेतलेला प्रवेश त्यांच्या राजकीय जीवनातील महत्त्वाचा टप्पा ठरला. कारण त्यामुळे त्यांना युरोपीयन इतिहासाचा, आंतरराष्ट्रीय संबंधांचा व युरोपीयन स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करता आला. त्यामुळे त्यांची वैचारिक कक्षा रूंदावली होती. त्यामुळेच ते भावी काळात आपला वैचारिक ठेवा निर्माण करू शकले.

आय.सी.एस.चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुभाषबाबूंना आत्मा विकून भौतिक सुख भोगण्यापेक्षा देशसेवा श्रेष्ठ वाटली होती. म्हणून त्यांनी मायदेशी येऊन सक्रिय सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय त्यांनी कोणाच्या सांगण्यावरून घेतला नव्हता तर त्यांच्यातील राष्ट्रवादाच्या स्वयंप्रेरणेने घेतलेला होता. त्या उद्देशाने घेतलेल्या निर्णयानंतर सुभाषबाबू जेव्हा भारतात आले. तेव्हा त्यांनी जुलै १९२१ मध्ये महात्मा गांधींची भेट घेतली होती. स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या राष्ट्रीय सभेला व्यापक अधिष्ठान प्राप्त करून देणाऱ्या व असहकार अंदोलनाला देशव्यापी बनविलेल्या महान नेत्याकडून स्वराज्यप्राप्तीच्या कृती तसेच गांधीजींनी असहकार आंदोलनाच्या वेळेस आगामी एका वर्षात स्वराज्य प्राप्तीचे दिलेले अभिवचन कसे पूर्ण करता येईल याचीही माहिती घेण्यास ते उत्सुक होते. भेटीत झालेल्या चर्चेतून गांधीजींकडे आपल्या स्वराज्याच्या चळवळीबद्दल स्पष्ट योजना नव्हती असे स्पष्ट प्रतिपादन सुभाषबाबू करतात. तसेच या भेटीदरम्यान सुभाषबाबूंनी उपस्थितीत केलेल्या प्रश्नांचे गांधीजी समाधान करू शकले नसल्याचे व त्यामुळे आपण स्वतः नाराज झाल्याचे ते सांगतात. सुभाषबाबूंना असहकाराच्या चळवळीमुळे प्रभावित झाले असले तरी ती अहिंसक मार्गाऐवजी क्रांतिकारी मार्गाने चालविले पाहिजे यावर सुभाषबाबू ठाम होते.

LIBRARY

गांधीजींच्या सूचनेनुसार सुभाषबाबू देशबंधू दास यांच्या भेटीसाठी गेले होते. देशबंधू हे स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय नेते आणि बंगाली तरुणांचे आकर्षणही होते. देशबंधूंची स्वराज्याबद्दल व त्याच्या प्राप्तीच्या मार्गाबद्दल असलेली स्पष्ट कल्पना सुभाषबाबूंना पटली होती. या भेटीपूर्वीच झालेल्या पत्रव्यवहारातून सुभाषबाबूंनी दास यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय कार्याला वाहून घेणार असल्याचे स्पष्ट केले होते. देशबंधूची स्वराज्यवादी भूमिका व क्रांतिकारी राष्ट्रवाद यामुळे सुभाषबाबू आणि चित्तरंजन दास यांच्यात केवळ वैचारिक जवळीकच निर्माण झाली नाही तर दास यांच्या रूपाने सुभाषबाबूंना राजकीय गुरू मिळाले. दास यांनाही सुभाषबाबूंसारख्या विश्वासू शिष्य मिळाल्यामुळे दास यांनी त्यांच्यावर बंगाल प्रांतिक काँग्रेसच्या प्रसिद्धी विभागाची आणि राष्ट्रीय स्वयंसेवक गटाची जबाबदारी टाकली. दास यांच्या मार्गदर्शनाखाली सुभाषबाबूंनी बंगालमधील असहकार चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन आपल्या राजकीय कारकिर्दीत सुरुवात केली होती. स्वातंत्र्यसंग्रामातील हा सहभाग सुभाषबाबूंच्या अखेरच्या घटकेपर्यंत अविरतपणे सुरू राहिला. असहकार आंदोलनातील सक्रिय सहभागामुळे डिसेंबर १९२१ ते ऑगस्ट १९२२ या काळात आठ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला होता. आपल्या राजकीय जीवनातील या पहिल्याच कारावासात आपल्या राजकीय गुरूसमवेत स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गावर व स्वतंत्र भारताच्या उद्दिष्टांबाबत विचार जाणून घेता आले. हे मार्गदर्शन सुभाषबाबूंच्या भावी राजकीय वाटचालीस मार्गदर्शक ठरले.

फेब्रुवारी १९२२ मध्ये चौरीचौरा घटनेमुळे गांधीजींनी जेव्हा असहकार आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला तेव्हा गांधीजींच्या या भूमिकेला सी. आर. दास आणि पं. मोतीलाल नेहरू यांनी विरोध केला होता. यावेळी सुभाषबाबूंनीही गांधीजींच्या दास यांच्या धोरणाला पाठिंबा देत गांधीजींच्या भूमिकेला विरोध केला होता. यानंतर काँग्रेसच्या व्यासपीठावर होणाऱ्या मतभेदांच्यावेळी सुभाषबाबूंनी दास यांची बाजू घेतलेली दिसते. पुढे

डिसेंबर १९२२ मध्ये गया काँग्रेसमध्ये १९२३ मध्ये येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये सहभागी होण्यासंदर्भात वाद उफाळून आला. यावेळी 'फेरवादी' व 'नाफेरवादी' असे सरळ सरळ दोन गट पडून निवडणुकीत सहभागी होण्याच्या फेरवाद्यांच्या ठरावाला अपयश आल्यामुळे देशबंधूंनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. काँग्रेसअंतर्गत 'स्वराज्य पक्षांची' स्थापना केली. स्वराज्य पक्षाने १९२३ मध्ये ज्या निवडणुका लढविल्या त्यात पक्षाला चांगले यश प्राप्त झाले. त्यामुळे कलकत्ता महानगरपालिकेत स्वराज्य पक्षाची सत्ता आली. यावेळी दासांनी सुभाषबाबूंना महानगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केले. आपल्या या कारकिर्दीत सुभाषबाबूंनी मोफत प्राथमिक शिक्षण, नागरी जाणीव निर्माण करून दिली. त्यावरून नेताजींच्या स्वप्नातील स्वराज्यवादी कल्पनेचा बोध होतो.

सुभाषबाबूंनी महानगरपालिकेतील आपल्या कार्याद्वारे लोकांना स्वयंशासनाचे धडे द्यायला सुरुवात केल्यामुळे इंग्रज शासन अटक करण्याची योजना आखत होते. दरम्यान, पोलीस कमिशनरच्या खुनाचा सूत्रधार म्हणून सुभाषबाबूंवर आरोप ठेवण्यात आला आणि जानेवारी १९२६ पासून मंडालेच्या तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. हा वर्षांच्या या तुरुंगवासात आजारपण, उपोषण आणि सी. आर. दास यांचा मृत्यू या जीवावर बेतणाऱ्या घडामोडी घडून आल्या. त्यामुळे ते गंभीर स्वरूपाच्या आजाराला बळी पडले. प्रकृती अस्वास्थावर मात करून सुभाषबाबूंनी आपल्या राजकीय कार्यात खंड पडू दिला नाही. स्वातंत्र्याबाबत सर्वत्यागाची ही तळमळ प्रेरणादायी वाटते.

काँग्रेसच्या राष्ट्रीय स्तरावर कार्यरत नसलेले सुभाषबाबू १९२७ पासून काँग्रेसच्या राष्ट्रीयस्तरावर महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसतात. यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू आणि सुभाषबाबू या दोन युवकांनी महत्त्वाची भूमिका बजावायला सुरुवात केली होती. सायमन कमिशनला विरोध संपूर्ण स्वराज्य मागणीचा पाठपुरावा यामुळे त्यांचे महात्मा गांधींशी मतभेद निर्माण झाले होते. एवढेच नव्हे तर संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा

पाठपुरावा करण्यासाठी सुभाषबाबूंनी इंडिपेन्डन्स लीगच्या स्थापनेत पुढाकार घेतला होता. त्यायोगे सुभाषबाबू काँग्रेसला अधिक लढाऊ रूप देण्याचा प्रयत्न करीत होते. डिसेंबर १९२८ च्या कलकत्ता अधिवेशनात नेहरू रिपोर्टमधील वासाहातिक स्वराज्याऐवजी संपूर्ण स्वराज्य असा दुरुस्तीचा ठराव सुभाषबाबूंनी मांडला होता. मात्र, तो अस्विकृत करण्यात आला. त्यात सुभाषबाबूंना जरी अपयश आले असले तरी आपली ध्येयनिष्ठा कायम ठेवून काँग्रेसमधील उजव्या नेतृत्वाविरुद्ध विद्रोह करण्याचे धाडस दाखविले. त्यावरून त्यांचा आपल्या विचाराबाबत असलेला ठामपणा सिद्ध होतो. कलकत्ता काँग्रेसमध्ये संपूर्ण स्वराज्याच्या ठरावाला विरोध करणाऱ्यांननीच १९२१ च्या लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर केला हा ठराव म्हणजे सुभाषबाबूंच्या ध्येयनिष्ठेला मिळालेली पुष्टी ठरली. ब्रिटिशांकडून राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांचे संपूर्ण स्वातंत्र्याचे लक्ष विचलित करण्याचा होत असलेला प्रयत्न बोस यांना जाणवला होता. त्यासंदर्भात सुभाषबाबूंनी सावधान करण्याचा प्रयत्न केला. परंतु गांधीजींनी त्याकडे दुर्लक्ष केले. असे सुभाषबाबूंना वाटते. त्यामुळे गांधी व बोस यांच्यातील वैचारिक मतभेदांमध्ये भर पडत गेलेली दिसते.

सुभाषबाबूंची १९३३ ते १९३८ या कालावधीतील अल्पकाळ सोडला तर प्रकृती अस्वास्थामुळे युरोपीय विजनवासात घालविला या काळात ते राष्ट्रीय चळवळीत प्रत्यक्ष सहभागी झाले नसले तरी आपल्या ध्येयनिष्ठेशी फारकत घेतली नाही तर या काळात त्यांनी युरोपीयन राजकारणाचा जवळून अभ्यास केला. तसेच मुसोलिनी, हिटलर यांच्या भेटी घेऊन ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्धच्या लढ्यात त्यांची भावी मदत घेण्याची रणनिती आखली होती. युरोपमधील प्रदीर्घ वास्तव्यानंतर भारतामध्ये परतताना फेब्रुवारी १९३८ मध्ये भरणाऱ्या हरिपूर काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाल्याची बातमी सुभाषबाबूंना समजली होती. बोस यांची ही निवड म्हणजे त्यांनी आजवर केलेल्या राष्ट्रसेवेचा सन्मान ठरला. या अधिवेशनात सुभाषबाबूंनी दिलेले भाषण काँग्रेसच्या भावी वाटचालीस

कलाटणी देणारे ठरले. तसेच हे भाषण म्हणजे वैचारिक, तात्विक बैठक ठरली. नियोजन, दारिद्र्य, बेरोजगारी, लोकसंख्या, औद्योगिकरण या मुद्यांच्या अनुषंगाने त्यांनी भारतात समाजवादाचा आग्रह ते धरतात. काँग्रेसच्या इतिहासातील महत्त्वाची घटना म्हणजे त्रिपुरा काँग्रेसची निवडणूक होय. यावेळी महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद आदी वरिष्ठ नेत्यांनी विरोध करूनही सुभाषबाबूंनी त्रिपुरा काँग्रेसची निवडणूक लढविली. त्यावेळी सुभाषबाबूंनी डॉ. सीतारामय्यांचा पराभव करून गांधीजीसह त्यांच्या अनुयायांचा रोष पत्करला होता.एवढे करूनही सुभाषबाबू अपेक्षित कल्पना साकारू शकले नाहीत. कारण या निवडीनंतर बोलाविलेल्या बैठकीत काँग्रेस कार्यकारिणीने सुभाषबाबूंना प्रखर विरोध केला होता. या असहकारामुळे सुभाषबाबूंना नवी कार्यकारिणी गठीत करता आली नाही. त्यामुळे त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. सुभाषबाबूंच्या या कृत्यामुळे काँग्रेसच्या ठरावांचा भंग होत असल्याच्या कारणावरून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून ऑगस्ट १९३९ मध्ये पक्षातून निलंबित करण्यात आले. काँग्रेसला पर्याय अथवा व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा म्हणून ही संघटना निर्माण झाली नव्हती, तर काँग्रेसअंतर्गत काम करून काँग्रेसला लढाऊ रूप देण्याच्या व साम्राज्यवादाच्या विरोधातील लढ्याला दुसऱ्या महायुद्धाचा फायदा व्हावा हा उद्देश त्या पाठीमागे होता. हा संदर्भ जाणून घेणे आवश्यक ठरते.

फॉरवर्ड ब्लॉकच्या स्थापनेनंतर जून १९३९ (मुंबई) मार्च १९४० (रामगढ) आणि जून १९४० (नागपूर) अशी तीन अधिवेशने पार पाडली. त्यामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर 'शत्रूची जी आपत्ती ती आपली सुसंधी' हे टिळकांचे तत्त्व लक्षात घेऊन गांधीजींनी सत्याग्रहाचे आंदोलन सुरू करण्याचा आग्रह सुभाषबाबूंनी धरला होता. तसेच त्यांनी बंगालमध्ये नागरी कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात केली होती. त्यामुळे त्यांना जुलै १९४० मध्ये अटक करण्यात आली.

स्वातंत्र्य आंदोलन एका निर्णायक टप्प्यांवर आले असताना तुरुंगात निष्काम बसून राहणे सुभाषबाबूंसारख्या प्रखर राष्ट्रवाद्याला पसंद नव्हते. युरोपीयन विज्ञानवासात मुसोलिनी, हिटलर यांच्याकडून घेतलेली मदतीची आश्वासने, सावरकरांचा जाज्ज्वल राष्ट्रवाद आणि रास बिहारी बोस यांची प्रेरणा सुभाषबाबूंना अस्वस्थ करीत होती म्हणून त्यांनी परदेशात पलायनाची भूमिका आखली होती. मात्र, सहजासहजी तुरुंगातून मुक्तता होणार नाही म्हणून त्यांनी अमरण उपोषणास सुरुवात केली. या डावपेचात बोस यशस्वी झाले. ब्रिटिशांनी या उपोषणाची धास्ती खाऊन बोस यांची प्रकृती सुधारेपर्यंत कलकत्त्यातील राहत्या घरी नजरकैदेत ठेवण्यास संमती दिली. ब्रिटिशांच्या नजरकैदेत राहून सुभाषबाबूंनी नैऋत्य सिमेच्या आदिवासी विभागातून प्रथम अफगाणिस्तान, रशिया, जर्मनी व नंतर जपानला जाण्याची योजना आखली या मोहिमेत सुभाषबाबूंचा पुतण्या शिशिरकुमार बोस आणि अकबर शाह यांनी मोठे सहाय्य केले. त्यानुसार १७ जानेवारी १९४१ च्या रात्री सुभाषबाबूंनी कलकत्ता सोडले पुढे ते काबुलमध्ये अल्पशे वास्तव्य करून मॉस्कोमार्गे जर्मनीमध्ये दाखल झाले. तत्कालीन परिस्थितीचा संदर्भ होऊन सुभाषबाबूंनी जर्मनी हे स्वातंत्र्ययुद्धाच्या हालचालीचे केंद्र निश्चित केले. या केंद्रावरून त्यांनी रेडिओ प्रसारण चालवून भारतातील देशबांधवांना राष्ट्रवादी संदेश देण्याची, 'चले जाव' आंदोलनाचे संचालन करण्याची व्यवस्था केली होती. जर्मनीतील या अल्पशा वास्तव्यात सुभाषबाबूंनी भारतीय स्वयंसेवक सेना व स्वतंत्र भारत केंद्र स्थापन केले होते. दरम्यानच्या काळात फेब्रुवारी १९४२ मध्ये जपानने सिंगापूर जिंकले होते. सुभाषबाबूंच्या भावी रणनीतीच्या दृष्टिकोनातून जपानचे हे आक्रमण महत्त्वाचे ठरले. त्यामुळे सुभाषबाबूंनी ब्रिटिशांविरुद्ध लढा उभारण्याचा बेत आखला. त्यासाठी जर्मनीहून जपानला जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर जर्मन पानबुडीने प्रवास करून सुभाषबाबू १३ मे १९४३ रोजी टोकियोत येऊन दाखल झाले. सुभाषबाबू जपानमध्ये येण्यापूर्वीच स्थापन झालेल्या आझाद हिंद सेनेचे

LIBRARY KOLHA

नेतृत्व सुभाषबाबूंनी करावे, असे रासबिहारी बोस यांना वाटत होते. त्यानुसार ५ जुलै १९४३ रोजी आझाद हिंद सेनेचे सुप्रिम कमांडर (सर्वोच्च सेनापती) म्हणून शपथ घेतली आणि 'चलो दिल्ली'चा नारा दिला. जपानने आझाद हिंद सेनेकडे ४०,००० भारतीय युद्धकैदी सोपविले होते. जपान शासनाने सिंगापूर पाठोपाठ अंदमान, निकोबार या बेटांचाही घेतलेला ताबा आझाद हिंद फौजेकडे दिला. आझाद हिंद फौजेमध्ये त्यांनी स्थापन केलेली झाशी राणी रेजिमेंटची स्थापना विशेषत्वाने जाणवते. त्याद्वारे समाजाच्या सर्व क्षेत्रातील स्त्रियांना समान संधी देण्याचा कृतिशील आदर्श सुभाषबाबूंनी घालून दिला. सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेचे महत्त्वाचे साध्य म्हणजे अस्थायी शासनाची स्थापना हे ठरले. त्याद्वारे ब्रिटिश सत्तेला पर्याय मिळाला होता. त्यावेळी सुभाषबाबूंनी स्वतः राष्ट्रप्रमुख पदाची शपथ घेऊन सर्व समावेशन मंत्रिमंडळही तयार केले. स्वतंत्र भारताच्या या भूभागांना 'शहिद' (अंदमान) व 'स्वराज' (निकोबार) अशी नावे दिली. आझाद हिंद फौजेच्या लढ्यातून नेताजींनी मणिपूरच्या मोईरांगमध्ये सर्वप्रथम भारताचा तिरंगा फडकाविला. याशिवाय इंफाळ व ब्रह्मदेशाच्या आठ क्षेत्रांत सेनेचा निकराचा लढा उभा केला होता. मात्र, जून १९४४ मध्ये पडू लागलेल्या मुसळधार पाऊस, सैनिकांना हिवताप, पटकी यांची झालेली लागण, अपुरा शस्त्रपुरवठा यामुळे आझाद हिंद फौजेला आपली घोडदौड मागे घेणे भाग पडले. नेताजींनी ही माघार अपरिहार्य परिस्थितीमुळे घेतली होती. पुढे ऑगस्ट १९४५ मधील जपानवरील अणुबॉम्ब हल्ल्यामुळे जपानला शरणागती पत्कारावी लागली. त्यामुळे आझाद हिंद सेनेचे पाठबळ नाहीसे झाले. त्यातूनही खचून न जाता साम्राज्यवादाविरुद्धची लढाई पुढे कार्यान्वित करण्यासाठी रशियाची संभाव्य मदत मिळविण्याचा प्रयत्न नेताजींनी केले होते. त्यासाठी रशियाने जिंकलेल्या 'मांचुरिया' प्रदेशात पोहोचविण्याचे अभिवचन जपानने दिले होते. मात्र, त्यात अनेक संभाव्य धोके होते. तरीही नेताजींनी स्वतःच्या जबाबदारीवर सिंगापूर मार्गे मांचुरियाकडे जाण्याचा निर्णय घेतला. याची दुसरी बाजू म्हणजे नेताजींनी

जपान सोडण्याचा निर्णय घेतला नसता तर इंग्लंड, अमेरिकेकडून ते बंदी म्हणून जेरबंद झाले असते. या पार्श्वभूमीवर पूर्ण विचाराअंती नेताजींनी निर्णय घेऊन १७ ऑगस्ट १९४५ रोजी सायगाव सोडण्याचा निर्णय घेतला. त्याच्या दुसऱ्यादिवशी फार्मोसा द्विपावर विमान कोसळून त्यात नेताजींचे अपघाती निधन झाले. मात्र, जपानकडून २२ ऑगस्ट रोजी त्यांच्या या निधनाची अधिकृत घोषणा करण्यात आली. नेताजींच्या अपघाती मृत्यूबद्दल अनेक शंका उपस्थित होत असल्या तरी भारत सरकारच्या अधिकृत दस्तऐवजांमध्ये नेताजींचा अपघाती मृत्यू झाला असल्याची नोंद मिळते.

एकंदरीत या प्रकरणाची मांडणी करताना सुभाषबाबूंनी काँग्रेसच्या माध्यमातून केलेले कार्य हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे योगदान देणारे ठरले आहे, असे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या कार्याचा ठसा जनसामान्यांवर पडलेला दिसतो. आपल्या स्वराज्यवादी भूमिकेशी प्रामाणिक राहून सुभाषबाबूंनी घालून दिलेला मातृभक्तीचा आदर्श आजच्या समाजाला प्रेरणा देत आला आहे. सुभाषचंद्र बोस यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन भारतीय राष्ट्रवादाशी प्रामाणिक राहण्याची वृत्ती दाखविली, तो वारसा आजच्या समाजातून लुप्त होऊ लाग्ला आहे. दिवसेंदिवस बळावत चाललेल्या भाषावाद, प्रदेशवाद, जमातवाद या समस्यांनी भारतीय राष्ट्रवादाला आणि पर्यायाने राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान मिळू लागले आहे, म्हणून सुभाषबाबूंनी जी राष्ट्रनिष्ठा दाखवून देशसेवा केली त्याची जाणीव आजच्या पिढीला झाली पाहिजे. स्वातंत्र्य चळवळीतील या उदात्त आदर्शाचे जतन आणि पालन करणे हे प्रत्येक भारतीयाचे नैतिक कर्तव्य आहे. त्या भूमिकेतून सुभाषबाबूंचा राष्ट्रवाद व देशसेवेसाठी केलेला त्याग भारतातील सर्व घटकांमध्ये रूजने आवश्यक आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधात सुभाषबाबूंच्या राजकीय जीवनप्रवासाचा व योगदानाचा आढावा घेत असताना सुभाषबाबू आणि गांधीजी यांच्यात वैचारिक मतभेद झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. त्याबाबत पूर्वगृह न ठेवता ते कोणत्या पार्श्वभूमीवर निर्माण झाले होते.

याचा विचार केला तर त्याबाबतची वस्तुस्थिती पुढे येते. १९२० नंतर स्वातंत्र्य आंदोलनाचे 'गांधीयुग' सुरू झाले. याच टप्प्यावर सुभाषबाबूंनी सक्रिय राजकीय सहभाग घेतला होता. त्यानंतरच्या काळात सुभाषबाबू जसे गांधीजींचे अनुयायी बनले नव्हते तसे गांधीविरोधकही नव्हते, हे स्पष्ट होते. गांधीजी आणि बोस यांच्यात जे मतभेद होते ते वैचारिक स्वरूपाचे होते. हे प्रथम जाणून घेणे आवश्यक ठरते. गांधीजी अहिंसक व सनदशीर मार्गाने स्वराज्याचे ध्येय साध्य करू इच्छित होते. त्याला सुभाषबाबूंचा प्रखर विरोध जाणवतो. अहिंसा हे सदासर्वकाळ वापरण्याचे शस्त्र नसून ते विशिष्ट परिस्थितीत वापरण्याचे शस्त्र आहे, असे सुभाषबाबूंचे मत होते. म्हणून त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनातील एक तंत्र म्हणून अहिंसेप्रती निष्ठा दाखविली नाही. त्यांनी आधुनिक व वैज्ञानिकदृष्टिकोनातून गांधीजींच्या राजकारणातील अध्यात्मवादाला विरोध केला होता. हे जरी खरे असले तरी सुभाषबाबू अहिंसेच्या विरोधात नव्हते. हे त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील आचरणांवरून स्पष्ट होते. सुभाषबाबूंना तत्कालीन साम्राज्यवादाविरुद्धच्या युद्धनितीत अहिंसेचा मार्ग परिणामकारक वाटत नव्हता. गांधीजी आणि बोस यांच्यातील मतभेद प्रामुख्याने वासाहातिक स्वराज्य, गांधी-आयर्विन करार, गोलमेज परिषद, क्रांतिकारकांविषयी भूमिका, नियोजन व औद्योगीकरण या प्रमुख मुद्यांवरून स्पष्ट होतात. मात्र, हे मतभेद व्यक्तिगत पातळीबाहेर होते हे प्रकर्षाने जाणवते. या मतभेदांची मांडणी करत असताना कोणाची बाजू श्रेष्ठ अथवा सत्य जाणणे अप्रस्तुत वाटते म्हणून या मतभेदातील नेमकेपणा वस्तुनिष्ठपणे अभ्यासला आहे. गांधीजी आणि बोस यांच्या वैचारिक संबंधांचा अभ्यास करताना सुभाषबाबूंना गांधीजींचे व्यक्तिमत्व आणि कार्य याबाबत नितांत आदर होता, हे स्पष्ट जाणवते. ब्रिटिश साम्राज्यवादाला प्रखर विरोध हा त्यांच्या विचारातील समान धागा बनला. आपल्या तात्त्विक मतभेदांचा अनिष्ठ परिणाम स्वातंत्र्य आंदोलनावर होणार नाही याबाबत दोन्ही नेते जागृत होते. त्यांच्या शुद्ध आचरणातून आणि सुसंस्कृत जगण्यातून नैतिकतेचे दर्शन घडते

म्हणून दोघांच्या रूपाने मिळालेल्या आदर्श प्रेरणांवर निष्ठा ठेवणे ही आजच्या समाजजीवनाची गरज ओळखून त्यांच्यातील मतभेदांचा अभ्यास केला आहे. स्वातंत्र्य चळवळीतील अखेरच्या टप्प्यातील नेताजींच्या योगदानाचा अभ्यास करताना 'आझाद हिंद सेने'च्या माध्यातून त्यांनी घालून दिलेला आदर्श मोलाचा वाटतो. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेला सर्वत्याग, राष्ट्राबद्दल प्रामाणिकनिष्ठा हे त्यांचे गुण प्रत्ययास येतात. तसेच नेताजींनी आझाद हिंद सेनेमध्ये विविध जाती धर्माच्या सैनिकांची भरती करून धर्मनिरपेक्षतेचा आदर्श घालून दिला होता. तसेच त्यांनी 'झाशी राणी' रेजिमेंटची स्थापना करून महिलांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण केला. पूर्वापारपणे आजही स्त्रीवर्गाला दुर्बल लेखून सामाजिक विकासाच्या संधीपासून वंचित ठेवले जात आहे. म्हणून सुभाषबाबूंच्या स्त्रीवादी विचारांचे स्मरण होणे आवश्यक वाटते. नेताजींनी स्त्रियांना केवळ सैनिक क्षेत्रात संधी दिली नव्हती तर अस्थायी शासनाच्या रूपाने त्यांना योग्य तो वाटा देऊन स्त्रिवादाचा सन्मान केला होता. हेच नेताजींच्या राजकीय योगदानातील महत्त्व होते. संपूर्ण जीवन संघर्षमय जगत असताना जनतेचा नेता म्हणून सुभाषचंद्र बोस यांचे नेतृत्व उदयास आले. धाडस, नि:स्वार्थी वृत्ती, प्रचंड आत्मविश्वास, संघटन कौशल्य, निर्णय क्षमता अशा अनेक गुणांचा समुच्चय त्यांच्या ठायी होता. सुभाषबाबुंचे हे गुण हिटलरने जाणले होते. म्हणून त्यांनी सुभाषबाबूंना 'फ्यूरर' ही पदवी बहाल केली होती. त्याचा अर्थ 'नेताजी' असा होतो.

**सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय विचार :**

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या आग्रभागी असणारे नेतृत्व तर होतेच; शिवाय ते राजकीय विचारवंतही आहेत. त्यांनी विशिष्ट सिद्धांताच्या रूपाने विचारांची सूत्रबद्ध मांडणी केली नाही. मात्र, त्यांच्या कृतिशील जीवनातून, भाषणांमधून आणि आचरणातून राजकीय विचारांचे संदर्भ सापडतात. त्याची संशोधनात्मक व विश्लेषणात्मक मांडणी प्रस्तुत शोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात केली आहे.

( सुभाषबाबूंनी ज्या विचारांबाबत आपली स्वतंत्र धारणा निश्चित केली होती. त्यात प्रामुख्याने समाजवाद, स्वराज्य, धर्मनिरपेक्षता व लोकशाही यांचा समावेश होतो. तिच सुभाषबाबूंची विचारधारा आहे. आजच्या समाजाच्या दृष्टीने प्रस्तुत संदर्भ त्यात सापडतात.) बोस यांनी समाजवादाबाबत भरीव विचारांची मांडणी केली आहे. त्यांनी पोथीनिष्ठ समाजवादाला फाटा देऊन भारताच्या तत्कालीन समस्यांच्या संदर्भात समाजवादाची फेरमांडणी केली आहे. समतेवर व न्यायावर आधारलेला समाज निर्माण करणे हे समाजवादाचे मुख्य तत्त्व सुभाषबाबूंनी मान्य केले होते. मात्र, त्याही पलीकडे जाऊन त्यांनी अध्यात्मिक समाजवादाची मांडणी केल्याचे दिसते. भारतीय परंपरेतील समाजवादाची जी अध्यात्मिक परंपरा होती, तिच परंपरा सुभाषबाबूंनी पुढे चालविलेली दिसते. 'मानवतेची सेवा हाच सेवा धर्म' हा भारतीय ऋषीमुनींनी घालून दिलेला आदर्श सुभाषबाबूंनी आपल्या समाजवादात प्रमाण मानला होता. त्यांच्या समाजवादी विचारांवर मार्क्स-लेनिनचा प्रभाव होताच; शिवाय स्वामी विवेकानंदांच्या मानवतावादाचाही प्रभाव पडलेला होता. या सर्वांमध्ये समन्वय साधून सुभाषबाबूंनी अध्यात्मिक समाजवादाची मांडणी केलेली आहे. सुभाषबाबूंनी व्यक्तिगत जीवनात धार्मिकता व अध्यात्म महत्त्वाचे मानले होते. म्हणून त्यांनी मार्क्सवादातील निधर्मवादाला विरोध दर्शविला होता. मात्र, त्यांना मार्क्सवाद किंवा साम्यवादाबद्दल आदर होता.

सुभाषबाबूंचा समाजवाद हा व्यवहारवादी होता. भारताचा सांस्कृतिक वारसा, भारतीय आदर्श आणि भारतीयांच्या गरजा यांच्या प्रेरणेने त्यांनी व्यवहारवादाची कास धरली होती. सुभाषबाबू समाजवादाची मांडणी करताना भारताला समाजवाद हा अनोखा नसून तो भारतीय संस्कृतिचा अमूल्य ठेवा आहे, याची जाणीव करून देतात. 'भारतीयांनी आपल्या संस्कृतीकडे दुर्लक्ष केल्यामुळेच त्यांना परकीय समाजवादाचा अंगीकार करण्याचा मोह जडला,' असे बोस म्हणतात. पश्चिमेकडील ऐहिकवादी दृष्टिकोनाचा भारतीय

अध्यात्मिक दृष्टीकोनाशी सुसंवाद होऊन साकारलेला भारतीय समाजवाद त्यांना योग्य वाटतो. त्यांनी आपल्या समाजवादात समतेला महत्त्व दिले होते. जन्म, वंश, जात यांवर आधारीत मानवनिर्मित आर्थिक व सामाजिक भेदभाव तसेच श्रीमंत-गरीब असा वर्गीय भेदभाव नष्ट झाला पाहिजे, असे सुभाषबाबूंचे प्रतिपादन होते. त्यांनी आपल्या समताधिष्टीत समाजरचनेत स्त्री-पुरुष समानतेला दिलेले महत्त्व विशेषत्वाने जाणवते. स्त्रियांना समाजाच्या सर्व क्षेत्रांत मुक्त संधी देऊन त्यांच्यात अधिकार व जबाबदारी यांची जाणीव करून दिली तर खऱ्या अर्थाने समताधिष्ठीत समाजव्यवस्थेचे ध्येय गाठता येईल, अशी त्यांची भूमिका होती. सुभाषबाबूंनी आपल्या या भूमिकेला झाशी राणी रेजिमेंटच्या स्थापनेच्या माध्यमातून मूर्त रूप दिले होते.

भारतातील शेतकरी आणि कामगार हे समाजातील महत्त्वाचे दोन घटक असतात, असे सुभाषबाबूंचे मत होते. त्या दृष्टिकोनातून त्यांनी शेतकरी व कामगारांच्या मुक्तीचा विचार मांडलेला दिसतो. सुभाषबाबू जेव्हा १९३१ मध्ये ट्रेड युनियनचे अध्यक्ष झाले तेव्हा त्यांनी शेतकरी व कामगारांच्या संघटनेला बळकटी आणली होती.

सुभाषबाबूंनी समाजवादी मांडणीत समतेबरोबर स्वातंत्र्यावरही भर दिला होता. 'सर्वक्षेत्रातील संपूर्ण स्वातंत्र्य' या व्यापक दृष्टिकोनातून त्यांच्या समाजवादाचा आशय स्पष्ट होतो. स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक व आर्थिक संपन्नतेचा समाजातील प्रत्येक घटकांना समान उपभोग घेता येईल, अशी व्यवस्था होय. अशी त्यांची धारणा होती. तसेच त्यांना संधीची समानताही अभिप्रेत होती. त्यांनी समाजवादाच्या प्रस्थापनेत राज्याची भूमिका महत्त्वाची मानून साम्यवादातील अराज्यवादाला विरोध केलेला दिसतो. समाजातील औद्योगिक व कृषी विकासासाठी नियोजन हे राज्यनियंत्रित असावे. देशाच्या उत्पादन आणि वितरण व्यवस्थेवर भांडवलदारांची मक्तेदारी निर्माण होऊ नये म्हणून राज्याला जादा अधिकार असावेत, असा विचार त्यांनी मांडला आहे. तसेच त्यांनी नवभारतासाठी म्युनिसिपल

समाजवाद आणि साम्यवादी संघाचीही कल्पना विषद केली आहे. त्याद्वारे सुभाषबाबूंनी राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणाची तत्त्व स्पष्ट केले आहे. सुभाषबाबूंनी समाजवादाच्या स्थापनेसाठी नियोजन समितीची कल्पना मांडली होती. त्याद्वारे भारतातील दारिद्र्य, लोकसंख्या, बेकारी यासारख्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करणे शक्य आहे, असे त्यांना वाटते. सुभाषचंद्र बोस यांनी समाजवादी विचारांची मांडणी करून आधुनिक भारतीय समाजापुढे आदर्श ठेवला आहे. म्हणून सुभाषबाबूंच्या या विचारांचे प्रस्तुत ठरणारे संदर्भ जाणून घेणे आवश्यक ठरते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंतप्रधान पंडित नेहरूंनी अर्थव्यवस्थेमध्ये समाजवादी धोरणाचा अंगीकार केला होता. त्यांना सुरू केलेल्या पंचवार्षिक योजनांमुळे समाजाच्या विभिन्न क्षेत्रांमध्ये अनेक चांगले बदलही घडून आले. मात्र, आजचा भारत समाजवादाच्या विरोधी असणाऱ्या उदारीकरणाच्या प्रवाहात सामील झाला आहे. त्यामुळे भारतीय समाज नवसाम्राज्यवादाच्या विळख्यात सापडला आहे. यासंदर्भात १९४३ मध्ये गांधीजींना लिहिलेल्या एका पत्रात सुभाषबाबूंनी द्वितीय महायुद्धानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीच्या केलेल्या भाकिताचे स्मरण होते. त्यांनी भविष्यात इंग्लंडऐवजी अमेरिका हे साम्राज्यवादाचे केंद्र बनेल असे म्हटले होते. आज त्यांच्या विचारातील दूरदृष्टीचा प्रत्यय येत आहे. सुभाषबाबूंच्या या चेतावणीची दखल स्वातंत्र्योत्तर राजकीय नेतृत्वाने घेतली असती तर सध्याच्या गंभीर संकटाला सामोरे जाण्याची वेळ आली नसती. म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात सुभाषबाबूंनी साम्राज्यवादाविरुद्ध घेतलेली प्रखर भूमिका रास्त होती, असे दिसून येते. १९९१ नंतरच्या भारतातील नव्या आर्थिक धोरणांचे कृषी, सेवाक्षेत्र, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, लघुउद्योग यांच्यावर झालेल्या घातक परिणामांची जाणीव होऊ लागली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनामुळे लाखो भारतीय कामगारांना कामावरून कमी करण्यात आले आहे. तसेच बेकारीही कमी होण्याच्या आशा मावळल्या आहेत. यासंदर्भात

सुभाषबाबूंनी कलकत्ता महानगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना केलेले कार्य महत्त्वाचे वाटते. या पदावर असताना त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण आणि समाजवादी धोरणांना अग्रक्रम दिला होता. म्हणून सुभाषबाबूंच्या समाजवादी धोरणांची नव्याने ओळख भारतीय समाजाला होण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या विचारांचा वारसा टिकविला तरच खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायावर आधारलेला समाज साकारेल.

सुभाषचंद्र बोस यांनी समाजवादाबरोबरच 'स्वराज्य' विषयक विचारांची मांडणी केली आहे. त्यावर योगी अरविंदो, लोकमान्य टिळक आणि सी. आर. दास यांच्या स्वराज्यवादी विचारांचा विशेष प्रभाव पडला होता. टिळकांनी चतुःसुत्रीद्वारे प्रथमच आक्रमकपणे संपूर्ण स्वराज्याची कल्पना पुढे आणली होती. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीत नवे चैतन्य निर्माण झाले होते. तसेच १९२२ च्या लाहोर येथील ट्रेड युनियनच्या अधिवेशनात देशबंधूंनी निःसंदिग्धपणे संपूर्ण स्वराज्याची मागणी केली होती. त्यामुळे सुभाषबाबूंची स्वराज्यविषयक धारणा अधिक पक्की बनली. सुभाषबाबू आपल्या स्वराज्यवादी भूमिकेवर शेवटपर्यंत ठाम राहिले आणि त्या भूमिकेचा त्यांनी सातत्याने पाठपुरावाही केलेला दिसतो. ज्यावेळेस नेहरू रिपोर्टमध्ये संपूर्ण स्वराज्याऐवजी वासाहतिक स्वराज्याची मागणी केली गेली. तेव्हा सुभाषबाबूंनी त्याला विरोध केला होता. एवढेच नव्हे तर संपूर्ण स्वराज्याच्या लढ्यासाठी १९२८ मध्ये 'इन्डिपेडन्स ऑफ इंडिया लीग'ची (भारतीय स्वराज्य संघटना) स्थापना केली होती. तसेच १९२८ च्या कलकत्ता अधिवेशनामध्ये संपूर्ण स्वराज्याच्या मागणीची ठराव फेटाळल्यामुळे सुभाषबाबूंनी काँग्रेस फुटण्याचा धोका स्वीकारत असल्याचे स्पष्ट केले होते. इंग्रजांनी आयर्लंडला मांडलिक स्वराज्य देऊन तेथील 'सीन-फिन' चळवळ नामशेष केल्याच्या पार्श्वभूमीवर सुभाषबाबूंनी दिलेला हा इशारा वस्तुस्थितीला धरून होता हे स्पष्ट होते. मात्र, जेव्हा १९२९ च्या लाहोर

काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वराज्य मागणीचा ठराव मंजूर झाला तेव्हा सुभाषबाबूंनी वेळोवेळी स्वराज्याबाबत घेततेली भूमिका योग्य होती हे स्पष्ट होते.

भारताच्या पारतंत्र्यास आणि नैतिक, सांस्कृतिक अधःपतनास पूर्णतः ब्रिटिशांची साम्राज्यवादी वृत्तीच कारणीभूत ठरली आहे, असे स्पष्ट करून सुभाषबाबूंनी स्वराज्य प्राप्तीची नीतीही स्पष्ट केलेली दिसते. सुभाषबाबूंना स्वराज्य कल्पनेत संपूर्ण स्वातंत्र्य अभिप्रेत होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य मिळून त्याला सर्व क्षेत्रात मुक्तपणे काम करता येणे, भारतीय समाजात आर्थिक समानता प्रस्थापित करणे, जातीभेद नष्ट करणे या व्यापक अर्थाने त्यांनी स्वराज्याची कल्पना मांडली होती. सुभाबाबूंनी गांधीजींनी स्वीकारलेल्या स्वराज्यप्राप्तीच्या अहिंसक मार्गाला विरोध केला होता. त्यांच्या दृष्टिकोनातून राजकारणात धर्माच्या वापरामुळे राजकारणावर धर्माचे प्राबल्य निर्माण होते आणि राजकारणाशी धर्माची घातलेली सांगड देशहिताच्या दृष्टीने घातक ठरत असते. ब्रिटिशांनी धर्माचा वापर करून 'फोडा आणि राज्य करा' हे तत्त्व सिद्धीस नेले. याच भूमिकेतून सुभाषबाबूंनी जातीय निवाड्यास आणि मुस्लिम लीगच्या भूमिकेस विरोध दर्शविला होता. यावरून सुभाषबाबूंचा स्वराज्यप्राप्तीचा मार्ग धर्मनिरपेक्ष स्वरूपाचा होता, असे दिसून येते. याशिवाय सुभाषबाबूंनी स्वराज्यासाठी सर्व त्यागाची भूमिका घेतलेली होती. तसेच त्यांनी स्वराज्यातील आर्थिक नीतीही स्पष्ट केली होती. कारण राजकीय समस्यांबरोबर सामाजिक व आर्थिक समस्यांचेही निराकरण करणारे स्वराज्य त्यांना साकारायचे होते. दारिद्र्य निवारणासाठी स्वस्त कर्ज वाटप तसेच जमीनधारणा पद्धतीतील बदल, सहकार चळवळीला प्रोत्साहन, कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण हे सुभाषबाबूंच्या नीतीतील प्रमुख घटक होते. सुभाषबाबूंच्या स्वराज्यविषयक विचारांचा अभ्यास केल्यानंतर या विचारांची पारतंत्र्याच्या काळात जशी निकड होती तशी आजही आहे असे वाटते. कारण स्वातंत्र्यप्राप्तीची पन्नास वर्षे साजरी होऊनही सुभाषबाबूंच्या कल्पनेतील

SHIVAJI

स्वराज्यापासून सर्वसामान्य जनता वंचित राहिलेली दिसेत. ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या व्यापक व प्रदीर्घ लढ्यातून भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी आज समाज जातीय, वर्गीय व धार्मिक भेदभावांचे उच्चाटन होऊ शकले नाही. वास्तविक राष्ट्राची खऱ्या अर्थाने प्रगती आणि समृद्धी होण्यासाठी समाज हा मुक्त व भेदभावरहित होणे आवश्यक असते. हा व्यापक अर्थ भारताच्या स्वराज्याला बहाल करण्याची जबाबदारी सर्व जनतेवर असते. परंतु या आपल्या कर्तव्याकडे जबाबदारवृत्तीने पाहिले जात नसल्यामुळे खऱ्या स्वराज्य स्थापनेच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण झाले आहे. म्हणून आजच्या समाजाला सुभाषबाबूंच्या स्वराज्यविषयक विचारांचे आकलन होणे गरजेचे वाटते.

सुभाषबाबूंना अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही प्रकारचे स्वराज्य अभिप्रेत होते. परंतु आर्थिक स्वरूपाच्या नव्या साम्राज्यवादामुळे भारताची आर्थिक नीती व परराष्ट्र धोरण श्रीमंत पाश्चात्य राष्ट्रांच्या प्रभावाखाली आणण्याची योजना कार्यान्वित झाली आहे. ब्रिटिशांच्या रूपाने घालविलेली राजकीय गुलामगिरी उदारीकरणाच्या नव्या रूपाने प्रस्थापित करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेचे माध्यम वापरले जाऊ लागले आहे. त्याला वेळीच पायबंद घालण्यासाठी समाजातील सर्वच घटकांनी पुढे सरसावण्याची गरज आहे. त्यासाठी लागणारे वैचारिक पाठबळ सुभाषबाबुंच्या स्वराज्य कल्पनेत आहे. या त्यांच्या विचारांची प्रस्तुतता समाजाच्या तळागाळातील घटकांपर्यंत पोहचवण्याची गरज वाटते.

स्वातंत्र्योत्तर स्थापन होणारे स्वराज्य हे लोकशाहीवर आधारित असावे अशी सुभाषबाबुंची भूमिका होती. भारताची भावी समाजव्यवस्था समाजवादी लोकराज्य तत्त्वावर आधारलेली असावी याचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे स्पष्ट होते. तत्कालीन स्वातंत्र्य चळवळीचे पूर्ण नेतृत्व कॉंग्रेसकडे होते. कॉंग्रेसच्या व्यासपीठावर विभिन्न विचारप्रवाह एकत्र येऊन कार्य करीत होते. त्यावेळी सुभाषबाबुंनी स्वातंत्र्योत्तर भारतात काही काळ प्रबळ मध्यवर्ती शासनाच्या आवश्यकतेचे प्रतिपादन केले होते. त्यांची ही

कल्पना फॅसिझम व कम्युनिझमधील आदर्श तत्त्वांची सांगड घालणारी होती. त्यामुळे सुभाषबाबू हे लोकशाही विरोधी होते असे म्हणता येणार नाही. कारण नवभारतापुढील आव्हानांना पेलण्याची क्षमता असणारी शासनसंस्था करणे हा उद्देश त्यापाठीमागे होता. हा त्यांचा व्यवहारवाद जाणून घेणे आवश्यक ठरते. देशाची अंतिम सत्ता जनतेच्या हाती असावी आणि लोकइच्छेवर आधारलेले शासन तयार व्हावे याबाबत सुभाषबाबू आग्रही होते.

पाश्चात्य लोकशाहीचे प्रारूप उदारमतवादी स्वरूपाचे आहे. या उदारमतवादाचा चुकीचा अर्थ लावून स्वैराचार व बेजबाबदार वृत्ती वाढीस लागून भारतात अराजकता निर्माण होऊ नये म्हणून साम्यवाद व फॅसिस्टवाद यांच्यातील समन्वयवादी पर्याय म्हणून संक्रमण काळासाठी मजबूत केंद्रोन्मुख शासनाची सुभाषबाबू कल्पना मांडताना दिसतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दुष्टप्रवृत्तीला संधी न मिळता स्वराज्याची उभारणी व्हावी. समाजात सामाजिक व आर्थिक सुधारणा साधाव्यात हा स्पष्ट उद्देश त्या कल्पनांमागे होता. या व्यापक भूमिकेतून त्यांच्या लोकशाहीचा आशय समजून घेणे आवश्यक वाटते. सुभाषबाबूंनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी तत्कालीन आंतरराष्ट्रीय संदर्भ आणि व्यूहरचनात्मक दृष्टिकोनातून जर्मनी, इटली व जपानची मदत घेतली होती. म्हणून त्यांना हुकूमशाहीचे समर्थक मानता येणार नाही. सुभाषबाबूंनी जर्मनीतील स्वार्थाने व वांशिक विद्वेशाने प्रेरित झालेल्या राष्ट्रवादावर टीका केलेली दिसते. सुभाषबाबूंनी स्वातंत्र्योत्तर काळात जबाबदारी शासनपद्धती निर्माण करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या अस्तित्वाची गरज प्रतिपादन केली होती. या उलट गांधीजींनी विसर्जित करण्याची भूमिका घेतली होती. हा पक्ष नाझी पक्षाप्रमाणे व्यक्तिकेंद्री न बनता लोकशाही व्यवस्था मान्य करणारा व इतर पक्षांच्या अस्तित्वाला बाधा आणणारा पक्ष बनणार नाही याची ग्वाही ते देताना दिसतात. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर भारतातील लोकशाहीचा आढावा घेतला असता त्यात अनेक दोष जाणवतात. हे दोष

अंगभूत नसून ती राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे अशांनी व ज्यांच्यावर राबविली जाते त्यांनी निर्माण केले आहेत. दिवसेंदिवस जनसामान्यांमधील शासनाबद्दलची विश्वासार्हता घटक चालली आहे. उदात्त लोकशाही मूल्यांची प्रस्थापना करण्याची जबाबदारी शासन झटकून देताना दिसते. यावरून जनता हा घटक केंद्रीभूत मानून शासन चालविण्याचा सुभाषबाबूंचा विचार राज्यकर्त्यांमध्ये रूजलेले दिसत नाही. म्हणून सुभाषबाबूंनी जबाबदार शासन पद्धतीचा घालून दिलेला आदर्श समाजापुढे येणे आवश्यक वाटते. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी जागृत लोकमताची व लोकसहभागाची आवश्यकता असते. मात्र, भारतात अभावानेच जागृत लोकमताचा प्रत्यय येतो आणि लोकसहभागाबाबत उदासिनताही जाणवते. निवडणुकीतील मतदानावरून आणि शासनाच्या ध्येय धोरणांच्या अंमलबजावणीवरून त्याचा प्रत्यय येतो. त्यामुळे भारतीय लोकशाहीला अपेक्षित यश प्राप्त झालेले दिसून येत नाही.

लोकशाहीमध्ये राजकीय पक्षाची भूमिका महत्त्वाची असते. परंतु भारतातील सदोष पक्षपद्धतीमुळे खरी लोकशाही समाजात रूजली गेली नाही. राजकीय पक्षातील सुसंघटितपणाच्या अभावामुळे आणि वैचारिक मागासलेपणामुळे एकही राजकीय पक्ष सार्थपूर्ण भूमिका बजावताना दिसत नाही. समाजाला मार्गदर्शन करण्याची क्षमता गमावलेल्या पक्षांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे भारतीय लोकशाहीला चुकीची दिशा मिळू लागली आहे. त्यामुळे सुभाषबाबूंच्या विचारांतील समाजाला मार्गदर्शन करणारा, बहुजनांचे नेतृत्व करणारा आणि भारताचे लोकसत्ताक गणराज्य स्थापन करण्याची क्षमता असणारा पक्ष उदयास येणे गरेजेच वाटते. सुभाषबाबूंचे लोकशाहीला बळकटी देणारे हे सर्व विचार अजूनही दुर्लक्षित राहिले आहेत. त्यांच्या विचारांचा घेतलेला हा शोध समाजातील सर्व घटकांनी आत्मसात करण्याची गरज आहे.

सुभाषचंद्र बोस यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करताना त्यांच्या धर्मनिरपेक्ष विचारांचे संदर्भ आजच्या परिस्थितीच्या संदर्भात जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. कुटुंबातील परोपकारी, धर्मसंहिष्णु आणि आध्यात्मिक वातावरण, स्वामी विवेकानंदांचा आणि रामकृष्ण परमहंस यांचा आदर्श या सर्वांच्या एकत्रित प्रभावातून सुभाषबाबूंची धर्मनिरपेक्षतेची धारणा साकारली होती. त्यांनी व्यक्तिगत जीवनात धर्माला महत्त्व दिले होते. केवळ पूजा-आर्चा, उपासना एवढाच मर्यादित अर्थ न घेता त्याग व सेवेवर आधारलेले धार्मिक तत्त्व त्यांनी स्वीकारले होते. पवित्र जीवन, मानव सेवा व त्याग हा अर्थ त्यांना स्वतःच्या धर्म कल्पनेत अभिप्रेत होता. त्यामुळे त्यांनी संसाराचा व पैशाचा मोह न बाळगता त्यागी भूमिकेतून अखंडपणे देशसेवा केलेली दिसेत. त्यांनी व्यक्तिगत जीवनात धर्माला स्थान दिले असले तरी अंधश्रद्धा, गुढवाद यांना विरोध दर्शवून विवेकवादाला व आधुनिकतेला महत्त्व दिले होते. त्यांना धर्माबाबतचा पाश्चात्य दृष्टिकोन निरीश्वरवादी, अनैतिक, भौतिकवादी व नकारात्मक वाटत असल्यामुळे तो नाकारला होता. बोस यांनी सार्वजनिक जीवनात धर्माला विरोध दर्शविलेला दिसतो. त्या दृष्टिकोनातून त्यांनी धर्म आणि राजकारण यांची फारकत केली होती. ब्रिटिशांकडून धर्माच्या आधारे हिंदुस्थानची राष्ट्रीय एकात्मता दुभंगण्याचा प्रयत्न केला जात होता. म्हणून सुभाषबाबूंनी हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. त्याद्वारे त्यांनी देशातील सर्व मुस्लिमांना स्वातंत्र्य चळवळीच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. स्वराज्यप्राप्तीच्या आंदोलनात धर्म हा मध्यवर्ती मुद्दा बनू नये आणि धर्माच्या आधारे हिंदुस्थानची फाळणी होऊ नये या विचाराचा ते सातत्याने पाठपुरावा करत राहिलेले दिसतात. एकंदरीत सुभाषबाबूंच्या धर्मनिरपेक्ष विचारांतून सर्वधर्मसमभाव, परधर्म संहिष्णुता, धार्मिक बंधुभाव ही प्रमुख तत्त्वे स्पष्ट होतात. त्यातून त्यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची मांडणी केली आहे.

बोस यांच्या हा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादी स्वतंत्र भारताच्या संविधानिक धर्मनिरपेक्षतेच्या चौकटीतून प्रत्ययास येतो. मात्र, स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षानंतरही धर्मनिरपेक्षतेचा पाया १
भक्कम झाल्याचे दिसत नाही. भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेच्या चौकटीत प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य उपभोगण्याचा समान अधिकार दिला आहे. मात्र, आज धार्मिक स्वातंत्र्याचे पर्यवसान धर्मांधतेत होऊ पहात आहे. देशापुढे असलेल्या अनेक समस्यांमध्ये धर्मांधतेच्या व जमातवादाच्या समस्यांनी भर घातली आहे. त्यामुळे भारतीय समाजातील सार्वजनिक जीवन असुरक्षित बनले आहे. काही राजकीय पक्ष आणि संघटनांकडून जाणीवपूर्वक हिंदुत्ववादी विचारांचा प्रचार होताना दिसत आहे. त्याला पर्याय म्हणून मुस्लिम मूलतत्ववाद्यांकडून जमातवाद पोसला जाऊ लागला आहे. १९८० नंतर त्याची प्रखरता जाणवू लागली आहे. त्याच्या परिणामातून रामजन्मभूमी-बाबरी मशिद वाद, १९९३ चा मुंबई बॉम्बस्फोट आणि गुजरातमधील गोध्रा हत्याकांड यासारख्या घडामोडी घडून येत असताना दिसतात. त्या रूपाने घडून येणाऱ्या वांशिक दंग्यांमुळे भारतीय संस्कृतीतील संहिष्णु वृत्ती ऱ्हास होत चालला आहे. तसेच संवैधानिक धर्मनिरपेक्षतेची चौकट डळमळीत होऊ लागली आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेपुढे गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय समाजात नेताजींनी आझाद हिंद सेना व आझाद हिंद सरकार यांच्या माध्यमातून घालून दिलेला धर्मनिरपेक्ष वैचारिक वारसा रूजने आवश्यक वाटते. बोस यांनी व्यक्तिगत धार्मिक भावनांना सार्वजनिक ठिकाणी येऊ दिले नाही. जेव्हा आझाद हिंद सेनेच्या हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून शपथ घेतल्यानंतर नेताजींना चेडियार मंदिरात आमंत्रित करण्यात आले होते तेव्हा त्यांनी तेथे जाण्याचे टाळून स्वतःच्या व्यक्तिगत धार्मिक भावनांवर आवर घातला होता. नेताजींनी धर्मनिरपेक्षतेच्या पाळलेल्या या मर्यादा आजच्या सर्वच राज्यकर्त्यांनी जाणणे गरजेचे वाटते. तसेच हा आदर्श समोर ठेवून सर्वच राजकीय पक्षांनी, संघटनांनी जोपासणे देशहिताचे ठरणार आहे. तरच सर्वसामान्य जनता

धर्मनिरपेक्ष विचारांची पायिक बनून व्यापक पायावर धर्मनिरपेक्ष भारताची उभारणी करता येईल.

सुभाषबाबूंच्या सामाजिक सुधारणावादी वैचारिक भूमिकेमुळे त्यांच्या राजकीय विचारात भर पडली आहे. बोस यांना स्वराज्य कल्पनेत ब्रिटिश सत्तेकडून केवळ राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ती करणे एवढाच संकुचित अर्थ अभिप्रेत नव्हता तर समाजाच्या सर्व क्षेत्रांत स्वातंत्र्य प्रस्थापित करायचे होते. ते समाजवादाचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनी भारतीय जनतेच्या राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्यालाही महत्त्व दिले होते. त्यादृष्टिकोनातून बोस यांनी सामाजिक सुधारणांविषयी विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी आपल्या सामाजिक सुधारणेत धर्म आणि जात याबाबत केलेला विचार स्पष्ट जाणवतो. धर्म ही व्यक्तिगत बाब असून सामाजिक ऐक्यामध्ये ती अडचण बनू नये असे त्यांना वाटते. धर्मातील अनिष्ट प्रथा, परंपरांना बगल देऊन धर्मातील आदर्श व उदात्त तत्त्वांचे पालन करावे, असे त्यांचे मत होते. सुभाषबाबूंनी धर्माबरोबर जातीप्रथेवरही प्रहार केला आहे. त्यांच्या या विचारांवर रामकृष्ण परमहंस आणि राजा राममोहन राय यांच्या विचारांचा अधिक प्रभाव पडलेला जाणवतो. याशिवाय बोस यांनी भारतीय दारिद्र्य व बेकारीबद्दलही विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी भारतीय विकासाच्या वाटेवरील या प्रमुख दोन समस्यांना सर्वस्वी ब्रिटिशांना जबाबदार धरले आहे. ब्रिटिशांनी भारतीय उद्योगांचा केलेला विनाश आणि शास्त्रीय व आधुनिक कृषी व्यवस्थेचा अभाव या दोन कारणांनी भारतात दारिद्र्य निर्माण झाले आहे, अशी भूमिका सुभाषबाबू घेतात. त्यांनी दारिद्र्य आणि बेकारी निर्मूलनाबाबत उपाययोजनाही सूचविलेल्या आहेत. याशिवाय बोस यांनी आपल्या विचारांत स्त्री सुधारणांबाबत विचारांची मांडणी केली आहे. त्यांनी ईश्वरी दृष्टिकोनातून स्त्रीवादाचा सन्मान केलेला दिसतो. स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह आदी सामाजिक सुधारणांचा ते स्वीकार करतात. बोस यांनी स्त्री सुधारणांबरोबरच शिक्षणविषयक

विचार मांडलेले आहेत. त्यांना समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक वाटते. त्यासाठी ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व कार्यक्रमाची गरज व्यक्त करतात. त्यांनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच वैज्ञानिक शिक्षणाचाही आग्रह धरलेला होता. सुभाषबाबूंनी आपल्या सुधारणावादी विचारांत लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाची दखल घेतलेली दिसते. त्यांनी लोकसंख्या वाढीचे गांभीर्य लक्षात घेऊन लोकसंख्या नियंत्रणाचे मार्गही स्पष्ट केले आहेत.

सुभाषचंद्र बोस यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक विचारांचा अभ्यास करता ते विचार भारताची अखंडता, आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी आणि भारतीय समाजाला अधिक सक्षम बनविण्यासाठी चिरंतन प्रेरणादायी ठरणारे आहेत, हे वास्तव नाकारता येत नाही.

# संदर्भ ग्रंथसूची

# संदर्भग्रंथ सूची

## मराठी:


१. अय्यर एस. ए., अनुवाद - करंदीकर म. अ. - आझाद हिंदं फौजेची कथा, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, सहावी आवृत्ती - २००४.

२. शिशिर कुमार बोस, अनुवाद - मोने निर्मला - नेताजी सुभाषचंद्र बोस, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, तिसरी आवृत्ती - २००४

३. फडके य. दि. - कहानी सुभाषचंद्रांची, खंड - १, विद्या प्रकाशन, पुणे - १९९४

४. बोस नेताजी सुभाषचंद्र, अनुवाद - भावे ह. अ. - तरुणांची स्वप्ने, वरदा प्रकाशन, पुणे, २००१, पहिली आवृत्ती २००१

५. वाळिंबे वि. स. - नेताजी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे चौथी आवृत्ती - १९९८

६. प्रा. पवार जयसिंग व पवार वसुधा - आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर - १९९८.

७. केळकर भा. कृ. - सुभाष, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती - १९७०

८. ओक पु. ना., नेताजींच्या सहवासात, माधवी प्रकाशन, पुणे

९. द. न. गोखले - गांधीजी - मानव आणि महामानव, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती - १९९६

१०. मोरे शेषराव - सावरकरांचा बुद्धिवाद - एक चिकित्सक अभ्यास, निर्मला प्रकाशन, नांदेड, १९९८.

## इंग्रजी:

1. Patil V. S. - Netaji Subhas Chandra Bose, His contribution to Indian Nationalism, starling Publishers Pvt. Ltd, New Delhi - 1998.

2. Sahoo Shridhar Charan - Subhas Chandra Bose (Political Philosophy) APH Publishing Company, New Delhi, First Edition -1997.

3. S. A. Ayyer - Selected Speeches of S. C. Bose, Publication Division, Govt. of India, New Delhi-1992.

4. Socialist Union - Twentieth Century Socialism, Pengiun Books, London - 1956.

5. Bose S. C. - The Indian Struggle (1920-42), Asia Publishing House, Bombay - 1967

6. Bose S. C. Chakraborty Rathin(Ed.) - The Indian Struggle (1920-34) Research Publishing and Printing Foundation, Kolkatta - 2001.

7. Netaji Research Bureau - Fundamental Question of India Revolution, Calcutta - 1970.

8. Bose S. C. - Cross Roads, Netaji Research Bureau, Calcutta - 1981.

9. Grover Virendar (Ed.) - Subhash Chandra Bose - A Biography of Vision and Ideas, Deep and Deep Publication - 1998.

10. Bose Sisir Kumar (Ed.) - Netaji Collected Works - Vol. II, Netaji Research Bureau, Calcutta - 1981.

11. Bose S. C. - The Mission of Life, Thacker Sprink and Company Pvt. Ltd, Calcutta - 1965.

12. Ayyer S. A. - The Indian Independence Movement in East Asia Vol. III, The oracle - 1981.

13. Guha Samar - The Mahatma and The Netaji, Sterling Publishers, New Delhi - 1986.

14. Bose S. K. and Bose Sugata - The Alternative Leadership, Subhas Chandra Bose (1939-1941) Vol. X, Netaji Research Bureau, Calcutta - 1998.

15. Bose Pradip - Subhas Bose and India Today - A New Tryst with Distiny?, Deep and Deep Publication, New Delhi - 1999.

16. Bose S. C. - Calcutta Municipal Gazette, Vol. II, The Calcutta Corporation - 1925.

17. Leonard Gardon - Brothers Against the Raj - A Biography of Sart and Subhas Chandra Bose, Penguine Books, New Delhi - 1990.

18. Mathur Girija Kumar - Subhas Chandra Bose, Publication Division, New Delhi.

19. Bose S. K. - Netaji Collected works, Vol. I, Netaji Research Bureau, Calcutta - 1980.

20. Bose S. C. - The Indian Struggle Vol. II, Netaji Collected Works, Netaji Reasearch Bureau, Calcutta.

<u>हिंदी :</u>

१. शर्मा रिता - क्रांतिवीर सुभाषचंद्र बोस, बोहरा प्रकाशन, जयपूर, प्रथम संस्करण, १९९७.

२. नेताजी बोल रहा है, फॉर्वर्ड ब्लॉक की यौत्किकता (नवम खंण्ड), रिसर्च पब्लिसिंग प्रिंटिंग फाउंडेशन, कलकत्ता, प्रथम संस्करण, १९९९.

३. डॉ. आर्य कर्मसिंह, क्रांतिवीर सुभाषचंद्र बोस, जवाहर पुस्तकालय, मथूरा, प्रथम संस्करण, १९९७.

४. शर्मा बेलाराणी-भारतीय स्वतंत्रता आंदोलन में नेताजी सुभाषचंद्र बोस का योगदान? सब्ला इन पब्लिकेशन्स, जयपूर, १९९९.

५. गुप्त विश्चप्रकाश, गुप्त मोहिनी - सुभाषचंद्र बोस व्यक्ती और विचार, राधा पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, १९९७.

**वृत्तपत्र:**

१. दै. लोकसत्ता (पुणे)

२. दै. सकाळ (सातारा)

३. दैनिक पुढारी (कोल्हापूर)

**राष्ट्रीय हिंदी मासिक:**

१. जन गर्जन (राष्ट्रीय मासिक), प्रधान संपादक, देव व्रत विश्वास (संसद सदस्य), २८, गुरुव्दारा रकाबगंज रोड, नई दिल्ली.